अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
MO.9860898564

संपादक – दिपक थोरात

सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रसिद्ध असणारे आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथील यात्रा उत्सवाला सुरुवात झाली असून मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आले आहे आलेल्या प्रत्येक भाविकांचे मन हेलावून टाकणारे हे दृष्य छायाचित्र (सुरेश कांबळे आष्टी)

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१३४ | बुधवार दि.२९ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -134 | WEDNESDAY DT.29 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# चंद्रकांत बोराडे कृष्णा पानसंबळचे 'आका' जनतेने आ. सुरेश धस,प्रकाश सोळंके,संदीप क्षिरसागर समजायचे का?



**बीड मतदार संघात दीडशे कोटी, माजलगाव मतदार संघात शंभर कोटी, आष्टी मतदारसंघात शंभर कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागाचा नंगानाच आ. धस, सोळंके, क्षीरसागर, गप्प का संबंधित भ्रष्टाचार बाहेर काढण्यावर ही थोडंसं बोलावं?**

**चंद्रकांत बोराडे कृष्णा पान संभाजी पाहिजे तर संबंधित कामावर एकदा जायला काय अडचण? बीड माजलगाव आष्टी या तिन्ही मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या रोड नाली पूल याची सत्य परिस्थिती पाहिली असेल तर घटनास्थळावर तिन्ही आमदारांनी जाऊन रस्त्याची व कामाची पाहणी करत जनतेसमोर सत्य परिस्थिती मांडावी सार्वजनिक बांधकामाचा नंगानाच हे जनतेला त्यानंतर दिसून येईल आणि तीनही आमदार आ.सोळंके आ. क्षिरसागर आ. सुरेश धस , हे याबाबत आवाज उठवतील का हे पाहणे गरजेचे आहे.**



**महायुती सरकारच्या २०१९ ते २०२४ काळात बीड जिल्ह्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये हजार कोटी पेक्षा जास्त निधी सहा मतदार संघात आला तो आमदारांनी स्वतःच्या फायद्यासाठी टक्केवारी मध्ये गुत्तेदाराच्या घशात घातला?**

**चंद्रकांत बोराडे, कृष्णा पानसंबळचा नंगानाच सार्वजनिक बांधकाम विभाग विक्रीला काढले का? दारूच्या नशेत तर्रर असलेला सार्वजनिक बांधकाम विभाग बीड चा उपविभागीय अभियंता चंद्रकात बोराडे अरेरावीला अनेकजन कंटाळले!**







बीड/ प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयामध्ये नंगानाच चालू आहे आष्टी मतदार संघामध्ये जवळपास १०० कोटी रुपयांचा रस्त्यासाठी आलेला निधी हा कृष्णा पानसंबळ सह अभियंत्याने तर सार्वजनिक बांधकाम विभाग बीडच्या नंगानाच करणारा व वादग्रस्त अधिकारी असलेला उपअभियंता चंद्रकांत बोराडे तसेच माजलगाव मतदार संघातील सार्वजनिक बांधकाम उप अभियंता वडवणी चंद्रकांत बोराडे यांनी जवळपास बीड मतदारसंघात दीडशे कोटी तर माजलगाव मतदार संघात शंभर कोटीच्या रस्त्याचा निधी गुत्तेदारांच्या घशात घालत राजकीय वरदहस्त लाभलेला सार्वजनिक बांधकाम विभागातील चंद्रकांत बोराडे व कृष्णा पान संबळ या अधिकाऱ्यांचे 'आका' आष्टी मतदार संघातील पानसंबळ चे 'आका' आ. सुरेश धस बीड मतदार संघाचे 'आका' संदीप क्षीरसागर माजलगाव मतदार संघातील वडवणी सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभियंता चंद्रकांत बोराडे यांचा 'आका' प्रकाश सोळंके यांच्या समोर कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे चंद्रकांत बोराडे व कृष्णा पान संबळ यांच्या विरोधामध्ये व यांच्या भ्रष्टाचाराचे पायामुळे हे राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधलेले आहेत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे राजकीय नेते उभारलेले आहेत त्यामुळे मात्र आता बीड' माजलगाव, आणि आष्टी, या तीनही मतदार संघामध्ये जवळपास साडेतीनशे कोटी रुपयांचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा घोटाळ्याबद्दल आ. संदीप क्षीरसागर आ. सुरेश आ. धस प्रकाश सोळंके जनतेला उत्तर देतील का या भ्रष्टाचाराची सखोल चौकशीची मागणी ही राज्य सरकारकडे व संबंधित विभाग विभागाकडे करतील का असा सवाल आता तिन्ही मतदारसंघातील जनता करत आहे. कारण हे तिन्ही मतदारसंघातील चंद्रकांत बोराडे व कृष्ण पानसंबळ हे या ठिकाणी आम्ही आमदाराचे माणस आहोत म्हणून वरील तिन्ही आमदारांचे नाव घेऊन कर्मचारी व तक्रारदार यांना आलेला भाषा वापरत आहेत. संबंधित कामांचे अनेक तक्रार असताना याची चौकशी का नाही तर सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता चंद्रकांत बोराडे सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टी चे उपविभागीय अभियंता कृष्णा पान संबळ यांचे 'आका' आता नेमकं तीन आमदार म्हणजेच प्रकाश सोळुंके संदीप क्षीरसागर असं जनतेने समजायचं का असा सवाल आता नागरिकांतून उपस्थित होत आहे.

बीड विधानसभेमधील बीड तालुक्यामध्ये कोट्यावधी रुपयाचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने घोटाळा करण्यात आलेला आहे या घोटाळ्यामध्ये मास्टरमाइंड म्हणून जर पाहिले गेले तर सार्वजनिक बांधकाम विभाग एक चा चंद्रकांत बोराडे उप अभियंता यांनी कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे बीड शहरासह बीड तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये रस्त्याचे जाळे निर्माण व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने कोट्यावधी रुपयाचा निधीला होता परंतु जवळपास १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी हा राजकीय वरदस्त लाभलेले कर कार्यकर्ते अधिकारी नेतेमंडळी यांच्या संगमत करून शासनाकडून लुटण्यात आलेला आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागीय लुटण्यामध्ये चंद्रकांत बोराडे माहीर आहे बोराडे ने बीड शहरासह ग्रामीण भागामध्ये जवळपास दीडशे कोटी रुपयांचे काम केल्याची चर्चा बीडच्या शासकीय विश्रामगृहामध्ये एका दारूच्या पार्टीमध्ये ऐकायला मिळत आहे त्यामुळे बोराडे ची चौकशी होणे गरजेचे आहे बीड शहरासह बीड तालुक्याचे व बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या प्रकरणाची सुखच चौकशीची मागणी करावी कारण आ.संदीप क्षीरसागर हे बीडचे आमदार आहेत चंद्रकांत बोराडे हा सांगतो माझ्या पाठीशी संदीप क्षीरसागर सुरेश धस प्रकाश सोळंके आहेत आपल्या ज्युनिअर अधिकारी कर्मचाऱ्यांनाही व तक्रारदारांला अरेरावीची भाषा वापरत बोराडे कडून अपमानाची वागणूक मिळत आहे तर या ठिकाणी मात्र आता बीड शहरासह ग्रामीण भागामध्ये सुमारे १५० कोटी रुपयांचा निधी हा बोराडे खर्च केला आणि फक्त कागदावर रस्ते दाखवून त्या ठिकाणी रस्त्याची अक्षरशः चाळणी झालेली असताना सुद्धा बोगस पद्धतीने बिल काढली सध्या बोराडेने केलेल्या रस्त्याच्या कामाची रोड नाली सिमेंट रोड डांबरी रोड सह वेगवेगळ्या भागाची सफल चौकशी होणे गरजेचे आहे दूध का दूध आणि पाणी होईल आ. संदीप क्षीरसागर हे या प्रकरणी आवाज का उठवत नाही तर बोराडे चे आका आमदार संदीप क्षीरसागर समजायचं का असा सवाल या ठिकाणी बीड विधानसभे तील बीड शहर व ग्रामीण भागातील नागरिकांमधून होत आहे.माजलगाव मतदारसंघात आ. प्रकाश सोळंकेंच्या आशिर्वादाने शंभर कोटीच्या कामात बोराडेंचा नंगानाच!

माजलगाव मतदारसंघात जवळपास शंभर कोटीचे बोगस काम आ. प्रकाश सोळंकेंच्या आशीर्वादाने झाले आहेत माजलगाव मतदार संघातील अनेक रस्त्यांना वाटोळ करण्यामध्ये प्रकाश सोळुंखेचा मोठा हात आहे आपले निकटवर्ती कार्यकर्ते आणि आमदार प्रकाश सोळंके यांच्या जवळचे गुत्तेदार कंस्ट्रक्शन वाले यांच्या घशामध्ये कोट्यावधी रुपयांचा निधी घालून टक्केवारी घेत आमदारांनी कामं केल्याचा आरोप विधानसभेच्या निवडणुकीत अनेकदा विरोधकांनी केलेला आहे. यातच सार्वजनिक बांधकाम विभाग वडवणीचा उप अभियंता चंद्रकांत बोराडे हा कोणालाही त्या ठिकाणी बोलून देत नाही माझी दादागिरी चालणार असंच बोलतो तर त्याच्या हाताखाली छोटे–मोठे अधिकारी हेही गुपचूप सह्या करतात तर वडवणी माजलगाव तालुक्यातील अनेक गावातील मुख्य रस्त्यांची चाळणी झालेली आहे रस्त्याची चाळणी होत झाल्याच्या नंतर खड्डे बुजविण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी अनेक गावांना २० २० लाख रुपयाप्रमाणे देण्यात आलेला आहे याची संख्या जर पाहिली तर कोट्यावधी रुपयाकडे आकडा जात असताना मात्र त्याच ठिकाणी दोन–चार महिने खड्डे बुजून झाल्यानंतर नवीन रस्त्याचा घाटका असा प्रश्न बाजूला मतदारसंघातील जनता करत आहे. तर चंद्रकांत बोराडे च्या कोट्यावधी रुपयाचा घोटाळा आहे शंभर कोटीचा घोटाळा हा माजलगाव मतदार संघामध्ये आ. प्रकाश सोळंकेचे आशीर्वादाने सार्वजनिक बांधकाम विभाग उपाभियंता चंद्रकांत बोराडे यांनी केल्याचं स्पष्ट होत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता चंद्रकांत बोराडे चा 'आका'माजलगाव चा आमदार प्रकाश सोळंके समजायचा का असा सवाल आता मात्र मतदारसंघातील नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. त्यामुळे आ.प्रकाश सोळुंकेनी माजलगाव मतदार संघातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनेक कामांची व सार्वजनिक बांधकाम विभाग उपाभियंता चंद्रकांत बोराडे यांची सखोल चौकशी ची मागणी आमदार प्रकाश सोळुंके यांनी करणे गरजेचे आहे. पुढील अंकामध्ये सविस्तर वृत्त प्रकाशित करण्यात येईल कोणत्या गावाला कितीचा निधी कोणत्या कंट्रक्शन काम केले व कोणी किती टक्केवारी घेतली व आ.प्रकाश सोळंकेने कोणाला काय दिले व विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या पक्षाच्या एका तालुकाप्रमुखांनी याची वडवणी तालुक्यातील एका कामाची सखोल चौकशी व्हावी म्हणून तक्रार केली होती परंतु त्या ठिकाणी चंद्रकांत बोराडे यांनी त्या तालुकाध्यक्षालाही धुडकावून लावले आहे असं खुद्द चंद्रकांत बोराडेनी सांगितले आहे. आमदार प्रकाश सोळुंके यांच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा तालुकाप्रमुख असलेल्या एका पदाधिकाऱ्याने लिखित तक्रार दिली होती त्या तक्रारीची दखल प्रकाश सोळुंकेने का घेतली नाही असा अहवाल ही माजलगाव मतदार संघातील जनता विचारत असताना शंभर कोटीचा निधी हा कोणाच्या घशात गेला याचे उत्तर प्रकाश सोळंकेने देणे गरजेचे आहे आमदार या नात्याने.

## आष्टी मतदारसंघातील त्याचं वाटोळ करण्यात सार्वजनिक विभागाचा अभियंता कृष्णा पानसंबळचा मोठा वाटा. सखोल चौकशीची गरज

सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन बीड येथील प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ हे सार्वजनिक बांधकाम विभागात नियुक्त झाल्यापासून सातत्याने बीड विभागातच कार्यरत आहेत त्यांचे अनेक पुढाऱ्यांची लागेबांधे असून अनेक निकृष्ट दर्जाची बोगस कामे केली आहेत अनेक कामे अनियमित आढळून येत असताना सध्याही याच पद्धतीने कामे सुरू आहेत शाखा अभियंता पदावर कार्यरत असताना संबंधित कृष्णा पान संबळ यांच्याकडे काही काळ बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक दोन चा उपकार्यकारी अभियंता म्हणून पदभार होता तसेच या काळात शिरूर पाटोदा या दोन्ही उपविभागात शाखा अभियंता व शिरूर कासारचे उपअभियंता म्हणून तसेच पैठण रस्त्यावरील पुल या कामात मोठ्या प्रमाणात अनियमित करण्यात आलेली आहे हे सर्व कामे जवळपास २३ कोटीची आहेत या सर्व कामाची तक्रार यापूर्वी विभागाकडे केल्यानंतर कुठलीही कारवाई न झाल्याने उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठ मध्ये याबाबत जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे तसेच लोक आयुक्त कडेही यांनी निकृष्ट कामाचे व अनियमतेच्या कामाची तक्रार करण्यात आलेली आहे वरील सर्व निकृष्ट काम हे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी लागेबांधे असल्याने करण्यात आलेली आहे तसेच स्थानिक पुढाऱ्यांचा वरदाहस्त असल्याने गेल्या अनेक वर्षापासून संबंधित अधिकारी याच ठिकाणी कार्यरत आहेत त्यांच्या काळातील सर्व कामातील अनियमितेची व भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून निलंबनाची योग्य ती कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे . आष्टी मतदारसंघातील अनेक रस्त्यांची वाट ही कृष्णा पानसंबळ या अभियंत्यामुळे लागलेली आहे या अभियंत्याच्या कार्यकाळामध्ये व कृष्णा पानसंबळ च्या अगोदरील पदभार असलेल्या अभियंता च्या काळातील जवळपास शंभर कोटीची कामाची सफल चौकशी होणे गरजेचे आहे. राजकमल कंट्रक्शन च्या माध्यमातून या ठिकाणी कोट्यावधी रुपयाचे काम झालेले आहेत राजकमल कन्स्ट्रक्शन सह अनेक कंट्रक्शन ची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. की त्यामध्ये फक्त थातूरमातूर कामं करत शभर पेक्षा कोट्यावधी रुपयाची दिलं उचललेले आहेत. राजकीय वरदहस्त लाभलेले कृष्णा पानसंबळ हे आमदार सुरेश धस यांच्या जवळचे निकटवर्तीय समजले जातात आमदार सुरेश धस याबद्दल काहीच कसं बोलत नाहीत असा सवाल आता आष्टी मतदार संघातील जनता करत आहे. तर यांचा 'आका' सुरेश धस असं समजायचं का असा सवाल आता आष्टी मतदारसंघातील नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे.

# ३० जानेवारी : जागतिक कुष्ठरोग निवारण दिन

जागतिक कुष्ठरोग दिन दरवर्षी जानेवारी महिन्याच्या शेवटच्या रविवारी साजरा केला जातो . हा दिवस कुष्ठरोगाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो . भारतात हा दिवस ३० जानेवारीला साजरा केला जातो . जागतिक कुष्ठरोग दिन साजरा करण्यामागचे उद्देश : कुष्ठरोगाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे , कुष्ठरोगाविषयी समाजात पसरलेले गैरसमज दूर करणे , कुष्ठरोग संबंधित कलंक आणि भेदभाव संपविण्याचे आवाहन करणे हे आहेत . जागतिक कुष्ठरोग दिन साजरा करण्याची सुरुवात १९५४ मध्ये झाली होती . या दिवसाची स्थापना फ्रेंच मानवतावादी राउल फोलेरू यांनी केली होती .

कुष्ठरोगाबद्दल अधिक माहिती : कुष्ठरोग हा एक संसर्गजन्य रोग आहे . कुष्ठरोगाला हॅन्सन रोग असेही म्हणतात . यास इंग्रजीत लेप्रसी असे म्हणतात . कुष्ठरोग हा जगातील सर्वात जुन्या नोंद झालेल्या रोगांपैकी एक आहे . हा आजार एक प्रकारच्या जिवाणूंमुळे होतो . कातडीबरोबरच हा आजार चेतातंतूंवरही दुष्परिणाम करतो . कातडीवर न खाजणारे चट्टे व बधिरता येते . नंतरनंतर तळव्यावर व्रण होणे , नाक बसणे , हातापायाची बोटे आखडणे किंवा वाकडी होणे , इत्यादी लक्षणे कुष्ठरोगात आढळतात . हा आजार आनुवंशिक नाही . हा आजार सांसर्गिक प्रकारच्या रुग्णांच्या संसर्गाने एकमेकांत पसरतो . यावर आता प्रभावी औषधे निघाल्याने बहुतेकांचा आजार सहा महिने ते दीड वर्ष या काळात पूर्ण बरा होतो . त्यासाठी कायमचे नुकसान होण्याआधीच या रोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखून उपचार व्हायला पाहिजेत .

कुष्ठरोग हा आजार मायको लेप्री नावाच्या जिवाणूंमुळे होतो . हे जंतू खूप सावकाश वाढतात . म्हणून हा आजारही खूप सावकाश वाढतो . ( २ ते ५ वर्ष लागू शकतात ) या आजाराचा प्रसार खूपच मर्यादित असतो . मुळात ९८% व्यक्तींना या आजाराविरुध्द उत्तम प्रतिकारशक्ती असते . म्हणजे फक्त २% जणांना हा आजार होऊ शकतो . त्यातही केवळ सांसर्गिक प्रकारच्या कुष्ठरोग-बाधित व्यक्तींकडूनच हे जंतू पसरू शकतात . उपचार सुरु केल्यावर महिन्याभरातच हे रुग्ण असांसर्गिक होतात .

सांसर्गिक कुष्ठ रुग्णांच्या श्वसनावाटे हे जंतू पसरतात . श्वासोच्छ्वासातून जंतू तर पसरतातच , पण शिंकण्या खोकण्यातून विशेष संख्येने जंतू उडतात . क्षयरोगाप्रमाणेच कुष्ठरोग पसरतो त्वचेतून संपर्काने तो पसरत नाही .

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम : राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम भारत सरकारने सुरू केला . भारतातील १९५४ - ५५ मध्ये मल्टी ड्रग थेरपी ( एम डी टी ) १९८२ पासून मोठ्या प्रमाणावर वापरात आली आणि १९८३ मध्ये राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम सुरू करण्यात आला . हा लोकसंख्येतील संसर्गाचे प्रमाण कमी करून आणि संसर्गजन्य स्त्रोत कमी करून रोग नियंत्रित करण्यावर आधारित होता . अशा प्रकारे रोगाच्या प्रसाराची साखळी खंडित होते . हा कार्यक्रम सुरुवातीला स्थानिक जिल्ह्यांमध्ये घेण्यात आला आणि १९९३-९४ पासून जागतिक बँकेच्या सहाय्यकांसह देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये त्याचा विस्तार करण्यात आला . केंद्रीय कुष्ठरोग प्रशिक्षण आणि संशोधन संस्था संस्था चेंगलपट्टू , रायपूर , गौरीपूर आणि आस्का येथे तर प्रादेशिक कुष्ठरोग प्रशिक्षण आणि संशोधन संस्था स्थापन करण्यात आल्या . याव्यतिरिक्त आग्रा येथे एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले . देशात रोगाचा दर कमी करण्यात उल्लेखनीय प्रगती झाली आहे .

डिसेंबर २००५ मध्ये राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय आरोग्य धोरणात सार्वजनिक आरोग्य समस्या म्हणून कुष्ठरोगाचे उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट भारताने साध्य केले , ज्याची व्याख्या प्रति १०,००० लोकसंख्येमागे १ पेक्षा कमी केस अशी आहे . दृष्टी : कुष्ठरोगमुक्त भारत हे व्हिजन आहे. ध्येय : कुष्ठरोगमुक्त भारत हे ध्येय म्हणजे एकात्मिक आरोग्य सेवा प्रणालीद्वारे , रोग बरा झाल्यानंतर अपंगत्वाची काळजी घेण्यासह , लोकसंख्येच्या सर्व घटकांना दर्जेदार कुष्ठरोग



बधीरता, चट्ट,बोटे आखडणे आणि तळपायावर व्रण या कुष्ठरोगाच्या खाणाखुणा आहेत.

सेवा मोफत उपलब्ध करून देणे हे आहे . उद्दिष्टे : उपराष्ट्रीय आणि जिल्हा स्तरावर १ / १०,००० पेक्षा कमी लोकसंख्येचा प्रसार दर कमी करणे . राष्ट्रीय स्तरावरील नवीन प्रकरणांमध्ये अपंगत्व कमी करणे इत्यादी आहेत.

धोरण : उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी , मुख्य धोरणे खालीलप्रमाणे आहेत : १) सामान्य आरोग्य सेवा प्रणालीद्वारे एकात्मिक कुष्ठरोगविरोधी सेवा २) नवीन कुष्ठरुग्णांची लवकर तपासणी आणि पूर्ण उपचार ३) प्रकरणे लवकर शोधण्यासाठी घरगुती संपर्क सर्वेक्षण करणे ४) कुष्ठरोगाच्या प्रकरणांचा शोध आणि उपचार वेळेवर पूर्ण करण्यात मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्यांचा (आशा ) सहभाग ५) अपंगत्व प्रतिबंध आणि वैद्यकीय पुनर्वसन सेवांचे बळकटीकरण ६) आरोग्य आणि निरोगीपणा केंद्रे आणि ब्लॉक प्राथमिक आरोग्य केंद्र / सामुदायिक आरोग्य केंद्र येथे सखोल देखरेख आणि पर्यवेक्षण करणे इत्यादी आहेत .

कुष्ठरोगाचे निदान आणि उपचार : - निदान आणि उपचारासाठी मोफत सेवा (मल्टी ड्रग थेरपी) प्राथमिक आरोग्य केंद्रे , सरकार यासारख्या सर्व सार्वजनिक आरोग्य सुविधांद्वारे प्रदान केल्या जातात . देशभरातील दवाखाने , सीएचसी , डीएच आणि वैद्यकीय महाविद्यालये येथे ही सुविधा मिळते . गुंतागुंतीची प्रकरणे, पुढील व्यवस्थापनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविली जातात . सर्व औषधे , निदान आणि सर्जिकल / नॉन-सर्जिकल कुष्ठरोगाच्या सर्व रूग्णांना विनामूल्य पुरविली जातात .

क्षमता निर्माण - कुष्ठरोगाचे निदान आणि व्यवस्थापनासाठी पुरेशी कौशल्ये विकसित करण्यासाठी दरवर्षी वैद्यकीय अधिकारी , आरोग्य कर्मचारी , आरोग्य पर्यवेक्षक , प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि आशा या सामान्य आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेतले जाते . महाराष्ट्रात कुष्ठरोगाच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे . १ जानेवारी १९ ते ३१ डिसेंबर २३ या कालावधीत महाराष्ट्रात ८३२८१ कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे . कुष्ठरोगाच्या निर्मूलनासाठी शासन स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातात . निधीही खर्च केला जातो , त्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे , म्हणून हा लेखनप्रपंच !

**संकलन : चंद्रकांत सरस्वती**
**प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

# विषेश पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षकांनी घेतला पोलीस ठाण्यांच्या कामगीरीचा आढावा

## चांगली कामगीरी बजावणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा केला सत्कार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २८/०१/२०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र व पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची गुन्हे आढावा बैठक घेवुन पोलीस ठाणे कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना २०२४ च्या तुलनेत अधिक सक्रिय व भरीव काम करण्यासाठी सर्व गुन्ह्यांची निर्गती, डिटेक्शन, अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन, समन्स वारंट बजावणी, फरार व पाहीजे असलेले आरोपी यांचा शोध व आरोपी अटकेसाठी उद्दीष्ट ठरवुन देण्यात आले. तसेच कोणत्याही परीस्थीतीत अवैध धंदे चालु द्यायचे नाही अशा स्पष्ट सुचना मा. पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र व पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना दिल्या.



त्याच प्रमाणे मागील महीन्यात उत्कृष्ट कामगीरी करणारे पोलीस ठाणे माजलगांव शहर, अंभोरा, पिंपळणेर, बीड शहर, पेठ बीड, अंबाजोगई शहर, युसुफ वडगांव, बीड ग्रामीण, स्थागुशा, आयटी सेल, मोटार परीवहन विभाग येथील अधिकारी व अंमलदार यांचा प्रशस्तीपत्र देवुन सन्मान करण्यात आला. यापुढे प्रत्येक पोलीस स्टेशन व शाखेतील उल्लेखनीय कामगीरी करणारे अधिकारी अंमलदार यांचा प्रत्येक गुन्हे आढावा बैठकीत सन्मान करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक यांनी सांगीतले.

तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती सन्मानचिन्ह प्राप्त झाल्याने त्यांचा बीड जिल्हा पोलीस दलातर्फे यथोचीत सत्कार करण्यात आला. तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र व पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यात चालु असलेले सौर ऊर्जा प्रकल्प, पवन ऊर्जा प्रकल्पाचे अधिकारी यांची बैठक घेवुन त्यांच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने मावेजासंबंधाने तसेच जमीन अधिग्रहण संबंधने महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन निर्णया प्रमाणे कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तर विणाकारण अडवणुक करुन खंडणी मागणाऱ्या इसमांविरुद्ध पोलीस स्टेशन येथे तक्रारी करण्याच्या सुचना प्रकाल्पाचे अधिकारी यांना देण्यात आल्या.तसेच मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी राज्या प्रशासकीय यंत्रणेसाठी आखुन दिलेल्या ७ कलमी कार्यक्रमाचा आढावा मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र यांनी आढावा घेतला.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी चांगली कामगीरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा सत्कार केल्याने अधिकारी व अंमलदार यांचेत सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे दिसुन आले. प्रत्येक पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे पोलीस ठाणे स्तरावर चांगले काम करणारे अधिकारी अंमलदार यांचा सत्कार करुन त्यांना चांगल्या कामगीरी करण्यासाठी प्रेरीत करावे असे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सांगीतले.

सदर बैठकीस मा. विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेन्द्र मिश्र, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

# अब्जाधीशांवर मेहरबानी नको मध्यमवर्गीयांचे कर्ज माफ करा

## शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ.भाऊ खेडकर

शिरूर कासार ।प्रतिनिधी

केंद्र सरकारने मुठभर उद्योगपती व अब्जाधीशांवर मेहरबान न होता कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकरी व मध्यमवर्ग यांच्या डोक्यावरील गृह व वाहनासह सर्वच प्रकारचे कर्ज माफ करावे अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेना उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी शिवसेनेचे आढावा बैठकीमध्ये मंगळवारी केली अब्जाधीशांचे कर्ज माफ करणे बंद करण्यासाठी कायदा केला तर आयकर व जीएसटी ५०% नी कमी केला जाऊ शकतो तसेच जीवनावश्यक वस्तूवरील कर संपुष्टात आणता येईल अशी मागणी केली आहे शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कर्ज माफ करण्याची मुद्द्यावरून पत्र लिहिण्याचे शिरूर तालुक्यातील शेतकरी बांधव मध्यमवर्गीय व्यापारी बांधवांना आश्वासन दिले आहे यात त्यांनी शेतकरी व मध्यमवर्गीयांचे बाजू भक्कमपणे मांडत म्हटले आहे की केंद्र सरकार सध्या अब्जाधीशांवर मेहरबान झाले आहे त्यांचे हजारो कोटी रुपये कर्ज माफ करीत आहे मध्यमवर्गीयांची साथ न देता सरकार अब्जाधीशांचे हित जोपासत आहे त्यामुळे तिजोरी रिकामी होत आहे म्हणूनच आम्ही शिरूर तालुक्यातील शिवसेनेच्या वतीने शेतकरी बांधवांच्या हिताचे पत्र लिहून शेतकरी व मध्यमवर्ग यांचे कर्ज माफ करण्याची मागणी करणार आहोत पहिल्यांदा केंद्र सरकार उद्योग व त्यांना कर्ज देत त्यानंतर त्यांचे कर्ज माफ करते अशा प्रकारे शासकीय तिजोरी रिकामी होत जाते व अब्जाधीशांचे खिसे भरत जातात असा आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला केंद्राने गेल्या पाच वर्षात ४०० ते ५०० धन कुबेर यांचे दहा लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले तर दुसरीकडे मध्यमवर्गीयांचे महागाई व बेरोजगारीमुळे कंबर्डे मोडले आहे एक व्यक्ती वर्षभरात बारा लाख रुपये कमवतो पण त्याच्या उत्पन्नातील सहा लाख रुपये विविध कर भरण्यातून सरकारला परत जात आहेत त्याला गृह आणि वाहन कर्जाच्या रूपाने दरमहा ६० ते ७० हजार रुपयांचे हफ्ते भरावे लागतात अशावेळी त्यांच्या पदरात काहीच पडत नाही म्हणूनच धनकुबेरांना कर्जमाफी देण्यास बंदी घालण्याचा कायदा बनविला पाहिजे या उलट मध्यमवर्गीयांचे गृह वाहन कर्ज माफ केले पाहिजे अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर हे करणार आहेत दरम्यान केंद्र सरकारने जर आपल्या अब्जाधीशांना कर्जमाफी देणे बंद केले तर आयकर पन्नास टक्क्यांनी कमी करता येऊ शकतो जीएसटी माफ करता येऊ शकतो जीवनावश्यक वस्तूवरील जीएसटी माफ करता येईल त्यामुळे सामान्य जनतेला मोठा दिलासा मिळेल असा विश्वास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी व्यक्त केला आहे






# जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व केंद्रीय प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये सर्वप्रथम महात्मा गांधी व डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे व केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक श्री अशोक जाधव सर सरपंच मंगल ताई प्रेमचंद लोढा, शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली, त्यानंतर राष्ट्रगीत गायनाने राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली, शाळेतील क्रीडा शिक्षक श्रीमान आनंद वाघमारे व प्रशांत वायभट सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट गाईड पथकाने शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हम्पे व मंचावरील सर्व प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आले, त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी श्रीमान सुभाष काकड सर यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली, प्रभात फेरीनंतर शाळेत आयोजित केलेले नृत्य विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले क्रीडाशिक्षक श्रीमान वाघमारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेले झांज पथक, लेझीम, तलवारबाजी इत्यादीचे प्रात्यक्षिक प्रमुख पाहुण्याच्या समोर करण्यात आले त्यानंतर शाळेत विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी, शालेय क्रीडा स्पर्धा मध्ये विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम करण्यात आला प्रमुख पाहुण्याचे हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. बक्षीस देणाऱ्या मध्ये प्रमुख शाळेला पंधरा हजार रुपये ची देणगी देणारे माजी प्राचार्य लक्ष्मणराव कवडे, पाच हजार रुपये ची देणगी देणारे माजी शिक्षक श्री पोथरकर सर, शालेय क्रीडा स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तयार करून देणारे पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य श्री विकास नाईकवाडे व पत्रकार संघाचे मार्गदर्शक पंडित जोगदंड यांनी शाळेला विजयी विद्यार्थ्यांना एकूण ११० प्रमाणपत्र दिले , तसेच विद्यार्थ्यांसाठी खाऊचे देणगी गावातील व्यापारी वर्ग तसेच प्रतिष्ठित नागरिकांनी व शिक्षण प्रेमी नागरिकांनी दिले, प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लक्ष्मण राऊत यांनी केले या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गंगाखेडकर मॅडम सरपंच श्रीमती मंगलताई प्रेमचंद लोढा, जि.प. सदस्य श्री अशोक शेठ लोढा, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री विलास काका शिंदे रस्ते सुरक्षा सप्ताह निमित्त पि.एस.आय.श्री गजानन जाधव साहेब, सर्व ग्रामपंचायत सदस्य,जिल्हा परिषदेचे आजी -माजी सदस्य

# ३० जानेवारी : हुतात्मा दिन ; स्वातंत्र्याची फळे चाखताना शहिदांचे स्मरण करण्याचा दिवस

हुतात्मा दिन म्हणजे देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर शहीदांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाणारा दिवस . हुतात्मा दिन हा राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो . हुतात्मा दिन कधी साजरा केला जातो ? ३० जानेवारी हा दिवस राष्ट्रीय स्तरावर शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो . सोलापूरमध्ये १२ जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो . पालघरमध्ये १४ ऑगस्ट हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो . हुतात्मा दिन का साजरा केला जातो ? ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे याने महात्मा गांधी यांची हत्या केली होती . सोलापूरमध्ये १२ जानेवारी १९३१ रोजी मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या चार हुतात्म्यांना फाशी देण्यात आली होती .

थोर महापुरुषांच्या नावाने त्यांचा जन्मदिन किंवा स्मृतिदिन ओळखला जातो . भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक थोर पुरुषांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले . त्या बलिदानाची आठवण व त्यांच्या कार्याची सदैव प्रेरणा मिळण्यासाठी त्यांचा बलिदान दिवस ' हुतात्मा दिन ' म्हणून पाळला जातो . ३० जानेवारी १९४८ रोजी भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार राष्ट्रपिता गांधी यांची हत्या करण्यात आली होती . या थोर राष्ट्रीय नेत्याला आदरांजली देण्यासाठी ३० जानेवारी हा दिवस ' हुतात्मा दिन ' म्हणून देशभर पाळला जातो .

सत्य, अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारे राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधींचे विचार इतके प्रभावी आहेत की त्यांनी संपूर्ण जगाला आपल्या विचारांनी भुरळ पाडली आहे . आपल्या अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले . त्यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला . साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या तत्त्वांची त्यांची जीवन प्रणाली होती .

त्यांनी प्रत्यक्ष स्वतः आचरण करूनच मग लोकांना उपदेश केल्याने त्यांच्या चुकांकडे बोट ठेवायला लोकांना फारशी संधीच मिळाली नाही . आपल्या जीवनकाळात जिथे ते गेले तिथल्या लोकांना अहिंसेच्या मार्गाने न्याय मिळवून देण्यासाठी ते लढले . त्यासाठी त्यांनी अहिंसा , असहकार या शस्त्रांचा वापर केला . १९१५ पासून भारतातील त्यांच्या कार्याला सुरुवात झाली . त्यांनी १९१७ साली चंपारण्य येथील शेतकऱ्यांच्य हक्कासाठी आंदोलन केले . पुढे १९२० साली असहकार आंदोलन केले . १९३० साली सविनय कायदेभंग करून ब्रिटिश सरकारचे लक्ष भारतीयांच्या समस्यांकडे व भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाकडे वेधण्याचा प्रयत्न केला .

१९४२ मध्ये चले जाव आंदोलन करून ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडले . या कामात त्यांना अनेक वेळा उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागला , पण त्यांनी कधीही त्याची पर्वा केली नाही . म्हणूनच देशाच्या कल्याणातच स्वतःचे हित जाणणाऱ्या या महान व्यक्तीला भारताचा राष्ट्रपिता म्हणून गौरविण्यात येते .

गांधीजी विषयी सुप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी म्हटले होते की , गांधी नावाची हाडामासाची व्यक्ती अस्तित्वात होती , यावर नवीन पिढीचा विश्वासच बसणार नाही , कारण असा आदर्श पुरुष पुन्हा होणे नाही . या वाक्यातुन त्यांच्या अमर्याद कार्याची प्रचिती येते .गांधीजींनी आपल्या आयुष्याच्या वाटचालीत ग्रामोद्योग , ग्रामस्वराज्य , आरोग्य , पर्यावरण , ग्रामस्वच्छता , सर्वधर्मसमभाव , इत्यादी विषयांवर मांडलेली मते आजच्या काळात मार्गदर्शक ठरतात . प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात सत्य , अहिंसा , शरीरश्रम , ब्रह्मचर्य , अपरिग्रह , सर्वधर्मसमभाव , आदींचे पालन केल्यास समाजातील वाईट भावना दूर होतील व देशाचा विकास होईल असे त्यांचे विचार आहेत . आपला हक्क व न्याय मिळवण्यासाठी हिंसा करूनच तो मिळवता येतो याच्या ते विरुद्ध होते. ते सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते व अहिंसेच्या मार्गाचे पुजारी होते .

त्यांनी देशाला स्वतंत्र , समृद्ध , आणि स्वयंपूर्ण करण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावले . या थोर महात्म्याचे कार्य देशासाठी अनमोल आहे . देशाचे राष्ट्रपती , उपराष्ट्रपती , पंतप्रधान , संरक्षण मंत्री आणि तिन्ही सेना दलाचे प्रमुख राजघाटावर गांधीजींच्या समाधी जवळ या थोर महात्म्याला या दिवशी श्रद्धांजली अर्पण करतात . हुतात्मा दिनानिमित्त या थोर महात्म्याला विनम्र अभिवाद !

भारतात ३० जानेवारी व्यतिरिक्त , २३ मार्च हा शहीद दिवस म्हणूनही साजरा केला जातो . दोन वेगवेगळ्या तारखांना हुतात्मा दिन साजरा करण्याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम आहे . पण दोन्ही हुतात्मा दिनात फरक आहे . ३० जानेवारी रोजी महात्मा गांधींची हत्या झाली , तर स्वातंत्र्यसैनिक भगतसिंग , राजगुरू आणि सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी फाशी देण्यात आली . त्यामुळे २३ मार्च रोजी अमर शहीद दिन हा अमर शहीदांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो .

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

# संपादक अविनाश इंगावले हे विशेष पुरस्काराने सन्मानित

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : पत्रकार क्षेत्रातील कोहिनूर हिरा तसेच भ्रष्टाचार, अन्याय विरोधात सत्याची लेखणी चालवून निर्भीडपणे वाचा फोडणारे आंदोलन लाईव्ह न्यूजचे मुख्य संपादक अविनाश इंगावले यांना महसूल प्रशासनाकडून विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गेवराई निवडणूक प्रशासनाने चांगली कामगिरी तसेच विशेष सहकार्य केल्या बद्दल आंदोलन लाईव्ह चे संपादक अविनाश इंगावले यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आहे.



सन २०२४ च्या विधानसभा निवडणूकीत निवडणूक प्रशासनाला विशेष सहकार्य केले तसेच प्रसिद्धी केली तसेच प्रशासनाला मदत केल्याबद्दल गेवराई महसूल व निवडणूक प्रशासनाच्या वतिने ( दि २६ जानेवारी ) रोजी आंदोलन लाईव्ह चे संपादक अविनाश इंगावले यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले तसेच त्यांच्यावर मित्र परिवाराच्या वतिने सुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे तसेच त्यांनी केलेल्या सन्मानाबद्दल गेवराई चे तहसिलदार तथा न्यायदंडाधिकारी संदिप खोमणे यांचे आभार मानले.



## जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची विभागस्तरीय युवा महोत्सव मध्ये प्रथम क्रमांक

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, कृषी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित विभागस्तरीय युवा महोत्सव सन २०२३-२४ विभागीय क्रीडा संकुल गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विभाग स्तरीय युवा महोत्सवा मध्ये कौशल्य विकास उपक्रम कृषी याविषयी ग्रोप्रोडक्ट प्रकल्प विभागस्तरीय प्रथम क्रमांक प्रशालेला मिळाला कृषी विषयातील सहभागी विद्यार्थी प्रणव कृष्णा सोनवणे, ओमकार संतोष चक्कर, माऊली प्रल्हाद रिंगणे, गोरख ज्ञानेश्वर पांचाळ, मार्गदर्शक शिक्षक कृषी विभाग प्रमुख विलास पवार सहभागी विद्यार्थी यांचा प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट यांनी गुणगौरव केले या यशाबद्दल कौतुकाची थाप दिली या दरम्यान शाळेतील शिक्षक सय्यद तल्हा माद्री, पंडित पी. एस, झेंडेकर एस.डी, राऊत ए.एम, कुडके पी.बी, गवळी बी टी , गायकवाड एस.टी, राठोड एल.बी, काळे व्ही.जी, हाटोटे व्ही.व्ही, करवंदे , पठाण पी.जी, जोशी जी.एस , वाघमारे एम. एम ,ईशरात फातेमा, बनसोडे एल.आर, पाठक एस.एस, रसाळ के.एल, जमीन बेगम शेख, होळकर आर. व्ही, गोरे एम.बी, ससे ए.आर, सर्वच शिक्षकाने या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल

# अजित दादांना एकच निवेदन बीडची बारामती करा ! - नितीन जायभाये

**सी.ओ. नीता अंधारे यांची तात्काळ बदली करा.... बीड शहर बचाव मंचाची मागणी**

**'अ' वर्ग श्रेणी काटेवाडी व बारामती प्रमाणे बीडचा विकास करा बीड शहर बचाव मंचाची मागणी**

( सरासरी दुष्काळी भागाप्रमाणेच पाऊस पडत असताना सुद्धा, काटेवाडी व बारामती परिसर अजितदादा व सुनेत्रा वहिनींनी 'अ'वर्ग श्रेणी गतिमान प्रशासन निर्माण करून समृद्ध व सुजलाम सुफलाम केला. दादा आणि वहिनी याच पद्धतीने 'बीडचा विकास करा ' असे एकच निवेदन सर्व बीडकरांच्या वतीने 'बीड शहर बचाव मंच' आपल्याकडे करत आहे.)

बातमी :- फार मोठ्या वेगळ्या परिस्थितीत आणि वेगळ्याच योगायोगाने बीड जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्थापन बहाल करण्यासाठी माननीय अजितदादा आपल्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद आलेले आहे. आपल्याकडून बीडकरांच्या अपेक्षा फार उंचावलेल्या आहेत. दादा,आपल्या कार्यशैलीचा व विकासाभिमुख नेतृत्वाचा परिचय बीडकरांना व संपूर्ण महाराष्ट्राला आहे. उद्या आपण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून प्रथमच प्रशासकीय दौऱ्यावर येत आहात. सर्व



जिल्ह्याचे व महाराष्ट्राचे लक्ष आपल्या दौऱ्याकडे लागलेले आहे. दादा आपण व सुनेत्रा वहिनींनी काटेवाडी व बारामती परिसराचा गेल्या काही वर्षातच कायापालट करून दाखवून अ' श्रेणी प्रशासन निर्माण करण्याचा व विकासाचा कार्यक्रम राबवला आहे. याबद्दल सर्व महाराष्ट्राला माहिती आहे. काटेवाडी गावातही आपण लोकांची सर्व कामे एकाच इमारतीतून व्हावी त्यासाठी ग्रामसचिवालय व मिनी मंत्रालय तेथे उभा केले. अ' वर्ग श्रेणीचे आरोग्य केंद्र,आरोग्य व्यवस्था व गतिमान प्रशासन आपण तेथे निर्माण केले आहे. सरासरी दुष्काळग्रस्त भागाप्रमाणेच पाऊस पडत असताना सुद्धा जलसिंचनाच्या अनेक योजना राबवून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारा समृद्ध बागायतदार शेतकरी वर्ग फार अल्पावधीतच आपण निर्माण केला आहे. दादा, तुमच्या प्रयत्नाने कुशल प्रशासनाने काटेवाडी व बारामती परिसरामध्ये समृद्ध भांडवलदार बागातदार शेतकरी वर्ग निर्माण झाला आहे. दादा, आपण कुशल प्रशासक व विकासाभिमुख दृष्टिकोन असलेले नेतृत्व आहात. काटेवाडी ची ग्रामपंचायत ते पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, अनेक वर्ष पालकमंत्री व महाराष्ट्र राज्याचे अनेक वर्षापासून उपमुख्यमंत्री हा सर्व राजकीय प्रवास करत असताना आपण फार मोठ्या कुशलतेने पुणे जिल्ह्याच्या विकासामध्ये फार मोठा सहभाग घेऊन योगदान केलेले आहे. आपल्याला कुशल प्रशासक म्हणून दीर्घ काळ अनुभव आहे. आपण पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारला असल्याकारणाने बीड करांच्या अपेक्षा खूप उंचावलेल्या आहेत. आमच्याकडे निवडून गेलेले लोकप्रतिनिधी विकास कार्यक्रम तर सोडाच, तो तर लांबच राहिला पण फक्त एकमेकांवर सतत कुरघोडीचा कार्यक्रम राबवत गुंडगिरी,अराजकता, जातीय तेढं, भ्रष्टाचार माजवत आहेत. विकासाच्या नावाने शून्य आहेत. दादा बीडची जनता फार त्रस्त आणि हैराण झालेली आहे. दादा, आज आपल्या पालकमंत्री म्हणून पहिल्याच प्रशासकीय दौऱ्याच्या निमित्ताने बीडला गतिमान, विकासशील अ'वर्ग श्रेणी प्रशासन निर्माण करा व जनतेच्या सर्व समस्या सोडवणारी भ्रष्टाचार मुक्त, घराणेशाही मुक्त विकासशील, गतिमान अ' वर्ग श्रेणी नगरपालिका निर्माण करा ही मागणी 'बीड शहर बचाव मंच' सर्व बीड करांच्या वतीने करत आहे.

# साधा पोलीस शंभर हायवाचा मालक -आ. धस यांच्या आरोपाने खळबळ !

बीड /प्रतिनिधी

गेल्या पंधरा वीस वर्षांपासून परळी येथेच कार्यरत असलेल्या भास्कर केंद्रे नावाच्या पोलीस कर्मचाऱ्याच्या नावावर शंभर हायवा आहेत. अवैध धंदे करणाऱ्या सोबत त्याची पार्टनरशिप आहे, वाळू असो जी राख प्रत्येक वाहतुकीत याचा हिस्सा आहे असा आरोप करत भाजपचे आ सुरेश धस यांनी खळबळ उडवून दिली आहे. जिल्ह्यात दोनशे पेक्षा जास्त अधिकारी कर्मचारी हे वाल्मिक कराड च्या जवळचे आहेत असा आरोपही धस यांनी केला आहे. केंद्रे सारख्याना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

२०-२० वर्षे अधिकारी एकाच ठिकाणी कसे काय काम करू शकतात? असा सवाल उपस्थित करून भास्कर केंद्रे हा पोलीस १५ वर्षांपासून परळीमध्ये असल्याचे सांगत त्याच्याकडे १५ जेसीबी, १०० राखेचे टीपर आणि तेथील मटका व्यावसायिकासोबत भागिदारी असल्याचे आरोप करून भाजप आमदार सुरेश धस यांनी परळीच्या पोलिसाचा पंचनामा केला.

भाजप आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत सौरभ भोंडवे खून प्रकरण, महादेव मुंडे खुनाची चौकशी, भगिरथ बियाणी खून प्रकरण तसेच बीडमधील पोलिसांच्या बदल्यांचा विषय आदी प्रकरणी मुख्यमंत्र्यांसोबत त्यांनी चर्चा केली. तसेच परळी नगर परिषदेचे ऑडिट व्हावे, अशी मागणीही त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

सुरेश धस म्हणाले, परळीतील राखेचे साठे जप्त करण्यात यावेत. राखेचे डेपो कुणाचे याची नावे मी समोर आणणार आहे. बाहेरच्या जिल्ह्यातील राखेची वाहतूक बंद झाली मात्र आमच्या जिल्ह्यात कशी काय चालू आहे, असा सवालही धस यांनी उपस्थित केला.

परळीतल्या केंद्रे नावाच्या पोलिसाकडे १५ जेसीबी, १०० राखेचे टीपर बीड जिल्ह्यात आणि परळीत अनेक वर्षांपासून काही पोलीस अधिकारी नोकरीला आहेत. त्यांना नेमका कुणाचा आशीर्वाद आहे? भास्कर केंद्रे हा पोलीस १५ वर्षांपासून परळीत आहे. त्याच्याकडे १५ जेसीबी, १०० राखेचे टीपर आणि तेथील मटका व्यावसायिकाबरोबर त्याची भागिदारी आहे, असे आरोप धस यांनी केले. मी केवळ सांगतोय म्हणून तुम्ही ऐकू नका,




तुम्ही एकदा परळीत जाऊन बघा, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

परळीत एकाच रस्त्याची पाच पाच वेळा बीले घेतलेली आहेत. खून प्रकरणात अटकेत असलेल्या विष्णु चाटेने ४६ कोटी रुपये बील घेतले आहे, असा आरोपही धस यांनी केला. वाल्मिक कराड आणि त्याच्यासोबतच्या आरोपींना फरार काळा कुणी कुणी मदत केली, हे तपासून संबंधित पोलिसांवर कारवाई करा. चौकशीअंती दोषी आढळले तर त्यांना बडतर्फ करा, अशी मागणीही धस यांनी केली.

# थोर समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस

जॉर्ज मॅथ्यू फर्नांडिस जिवन चरित्र (जन्म ३ जून १९३० - मृत्यू २९ जानेवारी २०१९) हे भारतीय कामगार संघटना, राजकारणी,आणि पत्रकार होते. त्यांनी १९९८ ते २००४ या काळात भारताचे संरक्षण मंत्री म्हणून काम केले. एक ज्येष्ठ समाजवादी, ते ३० वर्षांहून अधिक काळ लोकसभेचे सदस्य होते, १९६७ मध्ये बॉम्बे (सध्याचे मुंबई) पासून ते २००९ पर्यंत, मुख्यतः बिहारमधील मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करत होते. ते संयुक्त समाजवादी पक्ष आणि समाजवादी पक्षाचे नेते, जनता पक्ष, जनता पक्ष (धर्मनिरपेक्ष) आणि जनता दल यांचे सदस्य आणि शेवटी समता पक्षाचे संस्थापक होते.

त्यांच्या कारकीर्दीत दळणवळण, उद्योग, रेल्वे आणि संरक्षण यासह अनेक महत्त्वाची मंत्रिपदे सांभाळून, २०२० मध्ये त्यांना मरणोत्तर पद्मविभूषण, भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला मूळचे मंगलोरचे रहिवासी असलेल्या फर्नांडिस यांना १९४६



मध्ये बंगलोरला पुजारी म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी पाठवण्यात आले. १९४९ मध्ये, ते मुंबईला गेले, जिथे ते समाजवादी कामगार संघटना चळवळीत सामील झाले. ट्रेड युनियनचे नेते बनून, फर्नांडिस यांनी १९५० आणि १९६० च्या दशकात भारतीय रेल्वेमध्ये काम करत असताना मुंबईत अनेक संप आणि बंदचे आयोजन केले. १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मुंबई दक्षिण मतदारसंघातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या एसके पाटील यांचा पराभव केला. ऑल इंडिया रेल्वेमेन फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी १९७४ च्या रेल्वे संपाचे नेतृत्व केले. फर्नांडिस १९७५ च्या आणीबाणीच्या काळात भूमिगत झाले जेव्हा त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना आणीबाणी लादण्यासाठी आव्हान दिले, १३ परंतु १९७६ मध्ये त्यांना अटक करण्यात आली आणि कुप्रसिद्ध बडोदा डायनामाइट प्रकरणात खटला चालवण्यात आला.१९७७ मध्ये, आणीबाणी उठल्यानंतर, फर्नांडिस यांनी अनुपस्थितीत बिहारमधील मुझफ्फरपूरची जागा जिंकली. उद्योगमंत्री या नात्याने त्यांनी गुंतवणुकीच्या उल्लंघनामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे खइच् आणि उेलर-उेश्रर यांचे भारतात काम करण्याचे परवाने रद्द केले. १९८९ ते १९९० या काळात रेल्वे मंत्री म्हणून ते कोकण रेल्वे प्रकल्पाचे प्रेरक शक्ती होते. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या आणि तिसऱ्या अटलबिहारी वाजपेयी मंत्रालयात (१९९८-२००४) संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी कारगिल युद्धाचा उद्रेक आणि पोखरण येथे आण्विक चाचण्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख केली. फर्नांडिस हे बराक क्षेपणास्त्र घोटाळा आणि तहलका प्रकरणासह विविध वादांनी घेरले आहेत. जॉर्ज फर्नांडिस यांनी १९६७ ते २००४ पर्यंत नऊ लोकसभा निवडणुका जिंकल्या. जर आपण वैयक्तिक आयुष्याकडे पाहिले समाजवादी विचारधारेच्या सहयोगी साथी लिला कबीर या जिवन साथी वास्तव बंगलोर कर्नाटक. भारत सरकारने जॉर्ज फर्नांडिस यांना मरणोत्तर पद्मविभूषण (२०२०) प्रदान करून त्यांच्या कार्याचा सन्मान केला.या थोर विचारवंत नेत्याचे दि२९ जानेवारी २०१९ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. जॉर्ज फर्नांडिस हे समाजवादी विचारवंत आणि क्रांतिकारी नेते होते, ते एक सच्चे राजकारणी, कामगार, शेतकरी, कामगारांच्या हक्कांसाठी लढणारे सच्चे सहकारी म्हणून ओळखले जातील इतिहास त्यांचे विचार, आचार आणि कार्य नव्या पिढीसाठी आदर्श राहील.त्यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

**डॉ राजेंद्र मुरलीधर सानप**
संचालक -महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड४३११२२

# ३१ जानेवारी पर्यंत विद्यावेतन देण्यात यावे नसता तीव्र आंदोलन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांचे उपविभागीय अधिकारी यांना पत्र

**युवा प्रशिक्षणार्थ्यांचे विद्यावेतन देण्यास कौशल्य विभागाकडून टाळाटाळ**

माजलगाव ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थी सहा महिन्याकरिता प्रशिक्षण घेत आहेत. बहुतांशी जिल्ह्यातील प्रत्येक प्रशिक्षणार्थी हा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर ) म्हणून तन मनाने विद्यादानाचे काम करत आहे. आज या कार्य प्रशिक्षण प्रणालीला पाचवा महिना लागला आहे. आपला कार्यकाळ सहा महिन्याचा असल्याने ते प्रशिक्षणार्थी हवालदिलं झाले आहेत. प्रशिक्षणार्थ्यांनी पाच महिन्याच्या प्रशिक्षण काळात जे विद्यादानाचे काम केले आहे त्याचा मोबदला पण त्यांना आजतागायत देण्यात आला नाही तालुकास्तरावरील



संबंधित अधिकाऱ्याची मानधनाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून जिल्हा कौशल्य विभागातील कर्मचाऱ्याकडून आपल्या ऑनलाईन मध्ये डिफॉल्ट असल्याचे सांगण्यात येत आहे .प्रत्येक वेळी आपली ऑनलाइन प्रणाली चुकीची असल्याचे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. असे बोलले जात आहे कित्येकदा जिल्हा कौशल्य विभागाकडून ऑनलाईन झालेले फाईल त्या डिलीट करण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी संबंधित विभागास योग्य त्या सूचना करून मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन देऊन तात्काळ निर्णय घ्यावा नसता दिनांक ३१ जानेवारी रोजी संबंधित कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांच्या मार्फत देण्यात आला या निवेदनावर शरद पवार, दिगंबर बादाडे, अविनाश क्षिरसागर, छाया शिंगाडे, पूजा शिंदे , अश्विनी फुंदे , विशाखा वक्ते , सम्रता पोटभरे , परमेश्वर नरसाळे, अमोल चव्हाण , श्रुती कदम, गोविंद आव्हाड, विजय पवार, अजय डाके, शेख आयशा, लक्ष्मण पवार , अंगद गरड, महादेव गरड, साळवे सुकेशनी आदीसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



# रुग्णसेवा ही ईश्वर सेवा असते रामानंद स्वामी

आष्टी ।प्रतिनिधी

आजचे युगे धावपळीचे योग आहे जेवढे आजाराचे प्रमाण वाढले आहे तेवढी संख्या आता हॉस्पिटलची सुद्धा वाढल्याने लोकांनाही आपले जीव वाचवण्यासाठी उपयोग होत आहे परंतु प्रत्येक डॉक्टरांनी रुग्णसेवा ईश्वर सेवा असते हे मनात धरून रुग्णांना सेवा द्यावी असे प्रतिपादन परमपूज्य श्री रामानंद स्वामी महाराज यांनी व्यक्त केले अगस्ती डेंटल क्लिनिकच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते कार्यक्रमात प्रसंगी उपस्थित मान्यवरांचा येथोचीत सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला युवा कार्यकर्ते राधेश्याम धस, सरपंच सागर दरेकर अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे, पोलीस निरीक्षक ईसाममुद्दीन पठाण, प्रवीण कोकाटे महेश कराळे, विकास अमृते, बंकट परकाळे, भरत जाधव, सचिन दळवी, डॉक्टर राहुल पवार, माजी सरपंच अशोक दातोंडे, संदीप रामगुडे, नंदू फसले,

सरपंच ईश्वर मेटे, सचिन डोके, पत्रकार सुरेश कांबळे,परमेश्वर काका शेळके, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते यावेळी डॉक्टर आशिष रोकडे अक्षय रोकडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर आभार सेवानिवृत्त पिएस आय शांतराम रोकडे यांनी मानले

# कृत्रिम बुध्दिमत्ता विद्यापीठास मुक्ता साळवे यांचे नाव द्यावे - विष्णू पाटोळे

**वडवणी ।प्रतिनिधी**

**सरकारच्या वतीने भारत देशातील पहिले कृत्रिम बुध्दिमत्ता विद्यापीठ आपल्या महाराष्ट्रात लवकरच स्थापन करण्यात येणार असून या विद्यापीठाला भारत देशामध्ये महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेल्या पहिल्या शाळेची पहिली विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी मातंग समाजाचे नेते विष्णू पाटोळे यांनी एका निवेदनाव्दारे केली आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, सरकारच्या वतीने भारत देशातील पहिले कृत्रिम बुध्दिमत्ता विद्यापीठ आपल्या महाराष्ट्रात लवकरच स्थापन करण्यात येणार असून या विद्यापीठाला भारत देशामध्ये महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेल्या पहिल्या शाळेची पहिली विद्यार्थिनी मुक्ता साळवे यांचे नाव देण्यात यावे व ते विद्यापीठ पुणे जिल्ह्यातील पुरंदर जवळ त्यांच्या पेठ गावी स्थापन करुन मुक्ता साळवे यांचा सन्मान करावा असेही विष्णू पाटोळे यांनी म्हटले आहे. मुक्ता साळवे यांचा जन्म

नावाचा सन्मान करावा. या देशाम ध्ये पूर्वीपासून जातीयतेची भावना समाजामध्ये व राजकारण्यामध्ये रुजलेली आहे. म्हणून तर देशासाठी किंवा समाजासाठी असे महान कार्य करणाऱ्या या समाजाला त्यांचे नाव देशपातळीवर उंचविण्यास आतापर्यंतच्या सरकारने त्यांची दखल घेतली नाही म्हणून परिणामी देशाच्या राष्ट्रीय पुरुषांच्या यादीमध्ये थोर देशभक्त असंख्य क्रांतिकारकांचे गुरु क्रांतीवीर लहूजी साळवे स्वतंत्र नायक वीर फकीरा साठे, स्त्री शिक्षणातील पहिली विद्यार्थीनी मुक्ता साळवे, फक्त दिड दिवस शाळेत जावून असे अजरामर साहित्याचे जनक आण्णाभाऊ साठे, राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे पहिले शिलेदार येल्याजी गोठे असे वीर समाजसुधारक हे आजपर्यंत राजकारण्यांनी जातीयतेच्या विचाराम ळे हे राष्ट्र पुरुषांच्या यादीपासून वंचित राहिलेले आहेत.




# हळदी कुंकवातून रोटरी ने केला स्तन कर्करोगाच्या जनजागृतीचा उपक्रम

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब अंबेजोगाई सिटीच्या सर्व महिला रोटरी सदस्य यांनी रोटरी ऐनस ने मिळून हळदी कुंकू चे आयोजन रोटरी ऑफिसच्या प्रांगणात केले होते. यावेळी स्तनच्या कर्करोगाची माहिती आणि त्यावरील उपाय या विषयी जनजागृती तसेच त्यावर आधारित भित्तीपत्रिका याचे अनावरण केले.

हळदी कुंकू समारंभ हा महिलांसाठी एक दिशादर्शक चळवळ ठरली पाहिजे. या माध्यमातून महिलांच्या आरोग्य व इतर प्रश्नांवर जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम रोटरी उद्यान येथे राबविण्यात आला. याप्रसंगी कर्क रोग पीडित अर्चना स्वामी यांनी रोगाची लक्षणे आणि त्यापासून बचाव कसा केला पाहिजे, या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. स्तनाच्या कर्क रोगाची जनजागृती करण्याचा अनोखा उपक्रम रोटरी क्लब ने राबवला.यावेळी रोटरी क्लबचे पदाधिकारी ,प्रकल्प संचालक प्रा रोहिणी पाठक , को.डायरेक्टर स्वरुपा कुलकर्णी , रो.मंजुषा जोशी, सुनंदा मुंदडा , कल्पना मुळवकर, कांचन काळे , रक्षा सोळंकी, मेघना मोहिते,सोनाली कर्णवट, सरिता जाजु,नमिता सारडा, जया मुडेगांवकर, प्रेमा बर्दापूरकर, सुनिता मोदी, डिम्पल मोदी,यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

## पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा मंजूर लाभार्थ्यांनी कागदपत्राची पूर्तता करून लाभ घ्यावा-आ.सुरेश धस

आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत ११ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. गावनिहाय ग्रामपंचायत समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

पंतप्रधान घरकुल योजना-ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले.प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी ६१५७,पाटोदा २९०२,शिरूर कासार २८०५ तिनी तालुक्यात घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा



जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे दोन दिवसात करावी. तात्काळ पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा कराव्यात म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा जाणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले आहे.

## माध्यमिक विद्यालय पिंपरखेड या शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी रशियाच्या विद्यार्थ्यांशी साधला संवाद

प्रतिनिधी /प्रतिनिधी

जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ एकदरा संचलित माध्यमिक विद्यालय पिंपरखेड ता. वडवणी येथील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स कॉल द्वारे रशियन विद्यार्थ्यान सोबत संवाद साधला संवादा दरम्यान कु. काळे नंदनी, जाधव अनन्या, दरेकर आदिती चि. समर्थ पुरी या विद्यार्थ्यांनी रशियन विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भारतीय स्थानिक वेळ आणि प्रमाण वेळ या विषयावर चर्चा करून भारतीय विद्यार्थी विदेशात गेल्यानंतर भाषा समस्या अशा वेगवेगळ्या विषयावर शाळेच्या विद्यार्थ्यांनी रशियन विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विदेशात जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठीचे योग्य मार्गदर्शन मिळाले संवाद साधताना विद्यार्थ्यांनी खूप मोठा आनंद व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष प्रा. दत्ता वाळसकर, मु. अ. विनोद लांबूड, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि गावकरी यांनी विद्यार्थ्यांच्या या धाडसी कार्याचे स्वागत केले. शाळेतील शिक्षक वृंद विठ्ठल मगर, दत्तात्रय शिंदे, अशोक वायभट, असाराम डोंगरदिवे, भारत बोचरे, दत्तात्रय जंगले, बाबू बोंबले, विजयसिंह शिंदे, दत्तात्रय पवार, श्रीराम तावरे, विनायक सरवदे, निर्मला फुलपगार, मीरा गायवळ, अमोल राऊत शिक्षकेतर कर्मचारी कल्याण चाळक, ज्ञानेश्वर निपटे, सचिन मात्रे, शिवदास चादर सर्व टीमने विद्यार्थ्यांचेअभिनंदन व स्वागत केले. व पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा

## अबब...! गेवराई तालुक्यात तहसीलदाराने एकाच ठिकाणाहून दिली २५ वेळेस मुरुम उत्खनन परवानगी

**तहसीलदार गेवराई, मंडळ अधिकारी चकलंबा, तलाठी यांच्यावर निलंबनाची कारवाई करा - जिल्हाध्यक्ष अजय सरवदे**

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यामध्ये रस्त्याचे कामे चालू आहेत यासाठी मुरूम अत्यावश्यक आहे करिता गौण खनिजांचे उत्खनन व वाहतुकीसाठी परवाना देण्याचे अधिकार तहसीलदार यांना ५०० ब्रासपर्यंत, उपविभागीय अधिकारी यांना ५०१ ते २०१२ ब्रासपर्यंत व जिल्हाधिकारी यांना २००१ ते २५००० पर्यंत प्रदान करण्यात आले आहे.

डीसीए इन्फ्रा चकलांबा श्री. अजमेरा यांना मौजे आडपिंपरी येथील ग.नं. व४४ मधून रस्त्याच्या कामासाठी मुरूम उत्खननासाठी रॉयल्टी भरणा करून मुरूम उत्खननासाठी परवानगी देण्यात आली होती.गेवराई तहसीलदार खोमणे, मंडळ अधिकारी चकलांबा व तलाठी आडपिंपरी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत शासन नियमावलीचे उल्लंघन करत आडपिंपरी येथील गट नंबर ४४ या एकाच ठिकाणाहून ५०० ब्रासच्या २५ वेळेस १२५०० ब्रास मुरूम उत्खननाची नियमबाह्य परवानगी दिली आहे. जिल्हाधिकारी बीड यांचेकडून एकत्रित १२५०० ब्रासची वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा (प) बहुजन आघाडी यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड, जिल्हा खनीकर्म अधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी बीड यांचेकडे केली आहे. गेवराई तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते यांनी सदर प्रकरणाची माहिती दिल्याने ह घोटाळा बाहेर निघत आहे.मुरूम उत्खनन करत असल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणी मुरूम उपसा थांबवत गेवराई तहसील कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचारी यांच्यावर विश्वास नसल्याने बीड तालुक्यातील मंडळ अधिकारी यांच्याकडून सदर ठिकाणाचा पंचनामा करत ईटीएस मोजणी करण्यात तहसीलदार गेवराई, मंडळ अधिकारी चकलंबा, तलाठी आडपिंपरी



यांच्या संगनमताने डीसीए इन्फ्रा चकलांबा श्री. अजमेरा हे अवैध मुरूम उत्खनन परवानगी घेणे अपेक्षित होते सदर प्रकरणी चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.




बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनास पांठीबा म्हणुन भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या रस्ता रोको आंदोलनात सतीष (भाऊ)जोगदंड ,डॉ.गणेश ढवळे,शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचचे प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील,भवानी ग्रुपचे अध्यक्ष सुधाकर गुंजाळ,प्रा.आबासाहेब जाधव,रेवण मोरे,खलील मुजावर,विवेक कुचेकर,महमद शरीफ,श्रीमंत सोनवणे, यांच्यासह अंसख्य मराठा बांधव उपस्थीत होते.

## गोवर्धन पवार यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार

बीड ।प्रतिनिधी

दिनांक (२७) शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे सामाजिक शास्त्र व क्रीडा विभागाचे शिक्षक गोवर्धन नवनाथराव पवार यांना भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. गोवर्धन पवार हे आपल्या सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये नेहमी सक्रिय असतात. तसेच ते भूगोल या विषयासाठी नवनवीन उपक्रम आयोजित करतात. स्पर्धा परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन रुजवावा व स्पर्धा परीक्षेची भीती विद्यार्थ्यांमध्ये राहू नये यासाठी प्रयत्न करतात. राज्यामध्ये जे शिक्षक भूगोल विषया विषयी जनजागृती करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करतात त्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. या निमित्ताने या संस्थेमार्फत २०२४ चा पुरस्कार गोवर्धन नवनाथराव पवार यांना जाहीर करण्यात



आला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रोटरी क्लब बीड मिडटाऊन चे अध्यक्ष नितीनजी गोपन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस.,कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेरगव्हाणकर या मान्यवरांच्या हस्ते गोवर्धन नवनाथराव पवार यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## चकलांबा येथील तरुणावरील हल्ला प्रकरणातील चार आरोपी अटक

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील चकलांबा येथे (दि.२७) रोजी सायंकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास भोसरी पोलीस स्टेशन , जिल्हा पुणे येथून महिला मिसिंग क्र. ३६४/२०२४ मधील तपास कामी दोन पोलिस अमलदार. हे पोलीस ठाणे चकलंबा येथे आले होते मिसिंग मधील मुलगी ही हिंदू असून व तिचा मोबाईल वापरलेले मुले हे मुस्लिम समाजातील असल्याने व ते चकलांबा येथील राहत असल्याचे निदर्शनास आलेने तसे त्यांनी आम्हाला कळवल्यावर आम्ही मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीला बोलावून ज्यांनी तिचा मोबाईल मध्ये स्वतःचे सिम टाकले आहे ते (मुलगा, आई, वडील) असे पोलीस स्टेशनला बोलावले होते त्या मुलाबरोबर त्याचे नातेवाईक पोलीस स्टेशनला आले होत , परंतु त्यापैकी बरेच नातेवाईक पोलीस स्टेशन चे आवारात असतांना आम्ही




त्यांना गेट चे बाहेर काढले व त्याच वेळी मिसिंग बाबत चौकशी चालू असताना गोपाल मधुकर उनवणे राहणार चकलंबा हा पोलीस स्टेशन मध्ये येऊन मुलीचे नातेवाईक यांचेशी गोड बोलून मुलीच्या नातेवाईकांकडून मुलीचा फोटो घेतला व त्याचे व्हाट्सअप ग्रुप वर मुस्लिम समाजाबद्दल काहीतरी विध्वंसक टाकणार होता तेव्हा आम्ही स्वतः तो मेसेज पाहताच आम्ही गोपाल याचा मोबाईल घेऊन तो संदेश डिलीट करून टाकला व त्याला पोलीस स्टेशन बाहेर जाण्यास सांगितले त्यावेळी तो पोलीस स्टेशन मधून जाताना आरडा ओरडा करत गेला त्यास आम्ही पुन्हा एक पोलीस अंमलदार पाठवून त्यास शांत करून घरी जाण्यास सांगितले व पोलीस स्टेशन चे गेट बाहेर त्याचे घराचे दिशेने सोडून आलो , परंतु तो पुन्हा काही वेळाने पोलीस स्टेशन समोर असलेल्या बसस्टँड मध्ये येऊन विनाकारण काहीतरी बडबड करीत होता या कारणावरून गोपाल उनवणे व मुस्लिम युवक यांच्यात बाचाबाची होऊन धक्काबुक्की झाली व आपसात भांडण झाले, आवाज ऐकताच पोलीस स्टेशन मधील अधिकारी व अंमलदार हे तात्काळ बाहेर गेले व त्यानंतर पोलिसांनी मध्यस्थी करून जमाव पांगवून गोपाल उनवणे यास पोलीस स्टेशन मध्ये आणून त्यास मेडिकल मेमो देऊन पोलीस अंमलदार यांचे सह वैदकीय तपासणी करून पुन्हा पोलीस स्टेशनला आणून त्याचे सांगितल्या प्रमाणे तक्रार घेऊन पोलीस ठाणे चकलंबा येथे गुन्हा दाखल करण्यात आला व त्यास पुन्हा बीड येथें जिल्हा रुग्णालयात पाठविले व आज रोजी ४ आरोपी अटक करून सदर आरोपी याना मा. न्यायालयात हजर केले आहे

## झोपडपट्टी वासियांच्या हक्कासाठी केज येथे झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीची स्थापना

केज ।प्रतिनिधी

**सरकारी जमिनीवरील घराखालील जागेचे अतिक्रमण कायम करून त्यांना नागरी सुविधा तसेच विविध सरकारी योजनेचा लाभ मिळावा यासाठी केज येथे बहुजन चळवळीतील नेते बाबुराव गालफाडे यांच्या निवासस्थानी आज दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी व्यापक बैठक घेण्यात आली. झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या बैठकीसाठी केज शहरातील बाबुराव गालफाडे, विनायक लोंढे, भिमराव हजारे, महादेव लांडगे, सोमनाथ राऊत,शरद कांबळे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते**

केज नगर परिषदेच्या हद्दीमध्ये अनेक झोपडपट्ट्या मधून सरकारी जमिनीवर अनेक गोरगरीब कुटुंब गेल्या अनेक वर्षापासून अतिक्रमण करून राहत आहेत. अतिक्रमित झोपडपट्टी धारकांकडे सरकारी जमिनीवरील घराखालील जागेचे मालकी हक्क / हक्क विलेख नसल्यामुळे त्यांना रमाई घरकुल, पंतप्रधान आवास योजना, शबरी घरकुल योजना अशा विविध योजनेचा लाभ घेता येत नाही. सरकारी जागेवरील झोपडपट्टीची अतिक्रमणे कायम करण्याच्या संदर्भाने महाराष्ट्र शासनाने अनेक




वेळा झोपडपट्टी धारकांच्या हिताचे निर्णय घेतलेले आहेत. परंतु प्रशासकीय उदासीनता आणि प्रस्थापित राजकीय लोकांचे असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष यामुळे झोपडपट्टी वासियांना त्यांचे अधिकार मिळालेले नाहीत.

झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांनी मागील अनेक वर्षापासून सरकारी जागेवरील अतिक्रमणे कायम करून झोपडपट्टी वासियांना त्यांचे मालकी हक्क मिळण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्या प्रयत्नाला यशही मिळाले आहे. म्हणून केज शहरातील बहुजन चळवळीत अग्रेसर असलेल्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन आज व्यापक बैठक घेऊन पुढील कार्यवाहीची दिशा ठरवण्यात आली. केज शहरातील सर्व अतिक्रमण धारकाचे अतिक्रमण कायम करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव तयार करून दाखल करण्याचे यावेळी ठरवण्यात आले.

## साधा पोलीस शंभर हायवाचा मालक -आ. धस यांच्या आरोपाने खळबळ !

बीड प्रतिनिधी - गेल्या पंधरा वीस वर्षांपासून परळी येथेच कार्यरत असलेल्या भास्कर केंद्रे नावाच्या पोलीस कर्मचाऱ्याच्या नावावर शंभर हायवा आहेत. अवैध धंदे करणाऱ्या सोबत त्याची पार्टनरशिप आहे, वाळू असो जी राख प्रत्येक वाहतुकीत याचा हिस्सा आहे असा आरोप करत भाजपचे आ सुरेश धस यांनी खळबळ उडवून दिली आहे. जिल्ह्यात दोनशे पेक्षा जास्त अधिकारी कर्मचारी हे वाल्मिक कराड च्या जवळचे आहेत असा आरोपही धस यांनी केला आहे. केंद्रे सारख्याना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

२०-२० वर्षे अधिकारी एकाच ठिकाणी कसे काय काम करू शकतात? असा सवाल उपस्थित करून भास्कर केंद्रे हा पोलीस १५ वर्षांपासून परळीमध्ये असल्याचे सांगत त्याच्याकडे १५ जेसीबी, १०० राखेचे टीपर आणि तेथील मटका व्यावसायिकासोबत भागिदारी असल्याचे आरोप करून भाजप आमदार सुरेश धस यांनी परळीच्या पोलिसाचा पंचनामा केला.

भाजप आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत सौरभ भोंडवे खून प्रकरण, महादेव मुंडे खुनाची चौकशी, भगिरथ बियाणी खून प्रकरण तसेच बीडमधील पोलिसांच्या बदल्यांचा विषय आदी प्रकरणी मुख्यमंत्र्यांसोबत त्यांनी चर्चा केली. तसेच परळी नगर परिषदेचे ऑडिट व्हावे, अशी मागणीही त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

सुरेश धस म्हणाले, परळीतील राखेचे साठे



जप्त करण्यात यावेत. राखेचे डेपो कुणाचे याची नावे मी समोर आणणार आहे. बाहेरच्या जिल्ह्यातील राखेची वाहतूक बंद झाली मात्र आमच्या जिल्ह्यात कशी काय चालू आहे, असा सवालही धस यांनी उपस्थित केला.

परळीतल्या केंद्रे नावाच्या पोलिसाकडे १५ जेसीबी, १०० राखेचे टीपर

बीड जिल्ह्यात आणि परळीत अनेक वर्षांपासून काही पोलीस अधिकारी नोकरीला आहेत. त्यांना नेमका कुणाचा आशीर्वाद आहे? भास्कर केंद्रे हा पोलीस १५ वर्षांपासून परळीत आहे. त्याच्याकडे १५ जेसीबी, १०० राखेचे टीपर आणि तेथील मटका व्यावसायिकाबरोबर त्याची भागिदारी आहे,



असे आरोप धस यांनी केले. मी केवळ सांगतोय म्हणून तुम्ही ऐकू नका, तुम्ही एकदा परळीत जाऊन बघा, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

परळीत एकाच रस्त्याची पाच पाच वेळा बीले घेतलेली आहेत. खून प्रकरणात अटकेत असलेल्या विष्णु चाटेने ४६ कोटी रुपये बील घेतले आहे, असा आरोपही धस यांनी केला. वाल्मिक कराड आणि त्याच्यासोबतच्या आरोपींना फरार काळा कुणी कुणी मदत केली, हे तपासून संबंधित पोलिसांवर कारवाई करा. चौकशीअंती दोषी आढळले तर त्यांना बडतर्फ करा, अशी मागणीही धस यांनी केली.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT